मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» गुरुवार, दि. 28 मे 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडमध्ये मालमत्ताकर वसुलीचा विक्रम!

## ऑनलाइन कर भरण्याकडे नागरिकांचा कल; 10% सवलतीचा लाभ घेत हजारो नागरिकांनी डिजिटल माध्यमातून भरला कर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या करसंकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात 1 एप्रिल ते 26 मे 2026 या दोन महिन्यांच्या कालावधीत 230 कोटींहून अधिक मालमत्ताकर जमा झाला आहे. आतापर्यंत शहरातील 2 लाख 32 हजार 385 मिळकतधारकांनी मालमत्ताकर बिलाचा भरणा केला आहे. उर्वरित मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर बिल भरावे, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे.



पालिकेकडून 30 जून 2026 पूर्वी मालमत्ताकर भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. त्याला शहरवासीयांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत 2 लाख 8 हजार 570 नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ताकर भरून 10 टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. या नागरिकांकडून 212 कोटी रुपयांहून अधिक मालमत्ताकराचा भरणा डिजिटल माध्यमातून करण्यात आला आहे.

शहरामध्ये निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या तसेच, मोकळ्या जागांसह एकूण 7 लाख 44 हजार 630 नोंदणीकृत मालमत्ता आहेत. महापालिकेकडून महिलांच्या नावावरील मालमत्ता, दिव्यांग नागरिक,पर्यावरणपूरक हाऊसिंग सोसायट्यांना विविध सवलती देण्यात येत आहेत.

ऑनलाइन कर भरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी 10 टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येते. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महापालिकेच्या कार्यालयात प्रत्यक्ष गर्दी टाळून घरबसल्या ऑनलाइन माध्यमातून मालमत्ताकर भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील मोठ्या संख्येने नागरिकांनी ऑनलाइन माध्यमातून कर भरण्यास प्राधान्य देत आहेत. त्यातून 10 टक्के सवलतीचाही लाभ घेतला आहे. सुलभ ऑनलाइन माध्यमातून बिल भरावे. उर्वरित मालमत्ताधारकांपर्यंतही लवकरच बिले देण्यात येत आहेत, असे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

### ऑनलाईन कर भरण्यास प्राधान्य

» पालिकेकडून 30 जून 2026 पूर्वी मालमत्ताकर भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. त्याला शहरवासीयांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत 2 लाख 8 हजार 570 नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ताकर भरून 10 टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. या नागरिकांकडून 212 कोटी रुपयांहून अधिक मालमत्ताकराचा भरणा डिजिटल माध्यमातून करण्यात आला आहे.

# रहाटणीतील तमारा हाऊसिंग सोसायटीच्या समस्या अखेर मार्गी

## आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या खंबीर भूमिकेपुढे विकसक नमले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी: चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांनी रहाटणी येथील तमारा हाऊसिंग सोसायटीच्या नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे सोसायटीच्या प्रलंबित समस्या सुटण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. सोसायटीमधील रहिवाशांनी विकासकांच्या मनमानी कारभाराविरोधात सुरू केलेल्या शांततापूर्ण साखळी उपोषणाची दखल घेत आमदार जगताप यांनी स्वतः पुढाकार घेतला आणि या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधितांची तातडीची संयुक्त बैठक बोलावली.



या महत्त्वपूर्ण बैठकीला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाचे सहशहर अभियंता सुनील भगवानी, कार्यकारी अभियंता विजय सोनवणे, जयवंत रोकडे, पर्यावरण विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट आणि कनिष्ठ अभियंता प्रताप मोरे यांच्यासह सोसायटीचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

या बैठकीत आमदार शंकरभाऊ जगताप यांनी सोसायटीच्या प्रलंबित समस्यांवर सविस्तर चर्चा करत बिल्डरला खडसावले आणि सर्व प्रश्न विनाविलंब मार्गी लावण्याचे स्पष्ट निर्देश दिले. लोकप्रतिनिधींच्या या खंबीर भूमिकेमुळे बिल्डरला अखेर नमते घ्यावे लागले असून, रहिवाशांच्या सर्व मागण्या मान्य करून त्या तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, बिल्डरने काही कामांना तत्काळ सुरुवातही केली आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी आणि त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी आपण नेहमीच कटिबद्ध असल्याचे सांगत, यापुढेही रहिवाशांना त्रास होऊ देणार नाही, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला आहे. या निर्णयामुळे तमारा हाऊसिंग सोसायटीमधील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी आमदार शंकर जगताप यांचे आभार मानले आहेत.

# अमृत भारत योजनेतून आकुर्डी रेल्वे स्थानकाचा कायापालट

## प्रवाशांसाठी लिफ्ट, सरकते जिने, एलईडी स्क्रीन आणि पार्किंग सुविधा; पुणे उपनगरीय रेल्वे प्रवास होणार अधिक सुलभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरात झपाट्याने वाढ होत आहे. देशाची जीवनवाहिनी म्हणून संबोधली जाणारी रेल्वे, उपनगरीय रेल्वे वाहतूक सर्वत्र सुसज्ज होताना दिसत आहे. लोणावळा ते पुणे उपनगरीय वाहतुकीसह महत्त्वपूर्ण व मध्य रेल्वेचे मुख्य स्थानक असलेल्या आकुर्डी रेल्वे स्थानकाचा केंद्र सरकारच्या अमृत भारत योजनेमार्फत आधुनिक पद्धतीने कायापालट होत असून, या स्थानकाने कात टाकली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील व राज्यातील रेल्वे प्रवाशांना अधिक सोयीसुविधा देत प्रवास सुखकर व आल्हाददायक व्हावा, यासाठी आकुर्डी रेल्वे स्थानक सुसज्ज होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. सध्या आकुर्डी रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण सुरू असून, बरेच काम प्रगतिपथावर आहे. पूर्वीचे आकुर्डी रेल्वे स्थानक आणि आता अत्याधुनिक सुविधांनी विकासलेले स्थानक प्रवाशांना सुखकर होत आहे. स्थानकाची बरीचशी विकासाची कामे प्रगतिपथावर असून, काही कालावधीतच सुसज्ज देखणे आणि पूर्णपणे कायापालट झालेले रेल्वे स्थानक निश्चितच रेल्वे प्रवाशांना सेवेने आकर्षित करणारे ठरेल.



### प्रवाशांसाठी अशी केली सोयीसुविधा

» स्थानकाला दोन फलाट असून, दोन्ही फलाटावरती सुसज्ज आधुनिक लिफ्ट सुविधा, एक्सलेटर सरकते जिने, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रवाशांसाठी आकर्षक अॅल्युमिनियम आरामदायी खुर्च्यांची प्रशस्त बैठक व्यवस्था, ठिकठिकाणी बसवलेले नवीन पंखे, दुतर्फा बसविलेल्या वेळापत्रक दाखवणारे एलईडी दिशादर्शक फलक, वातानुकूलित प्रशस्त प्रतीक्षागृह, प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी शौचालय, स्वच्छतागृहांची सुविधा, दिव्यांग व ज्येष्ठांसाठी रॅम सुविधा, सरकते जीने व दादराची व्यवस्था, आकर्षक रंगरंगोटी केलेले स्वच्छ सुंदर रेल्वे स्थानक प्रवाशांच्या स्वागतासाठी काही कालावधीतच पूर्णत्वाने सज्ज होत आहे.

आकर्षक मुख्य प्रवेशद्वाराजवळच दोन्ही बाजूने उपप्रवेशद्वार, आकर्षक सरकते जीने, ज्येष्ठ, दिव्यांग महिलांसाठी रॅम्पच्या साह्याने प्रवाशांच्या स्वागतासाठी सज्ज आहेत. या प्रवेशद्वारामुळे प्रवाशांच्या गर्दीवर अंकुश ठेवण्यात निश्चित मदत होईल. उपप्रवेशद्वाराजवळच प्रवाशांच्या वाहनांची सुसज्ज, सुरक्षित अशी पार्किंग व्यवस्था ऊन -वारा- पाऊस यांपासून रक्षण करण्यासाठी भव्य आकर्षक आच्छादने असणारी वाहनांसाठी "पे अँड पार्क" ची सुलभ व्यवस्था, प्रवाशांच्या वेळेची बेरीज साधण्यास सुकर होईल. या मुख्य व उपप्रवेशद्वाराजवळ आत-बाहेर सुसज्ज अशा भव्य आकर्षक सूचक वेळापत्रक दर्शविणारी इलेक्ट्रॉनिक एलईडी स्क्रीन असल्यामुळे प्रवासाची वेळ आणि दिशा यांच्यात सांगड घालता येणार आहे.

> सध्या पुणे, कर्जत ते पनवेल दरम्यानच्या स्थानकांचा अंतिम पाहणी दौरा सुरू असून, केंद्र सरकारच्या अमृत भारत योजनेअंतर्गत आकुर्डी रेल्वे स्थानकाचे काम प्रगतिपथावर आहे. पिंपरी, चिंचवड, आकुर्डी आणि देहूरोड व तळेगाव या रेल्वे स्थानकांवर प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधा प्राप्त करून आकर्षक आणि सुशोभीकरण केलेले स्थानक बनविण्यात येणार आहे. तसेच कर्जत ते पनवेल 29.6 किलोमीटरच्या ट्रॅकचे काम प्रगतिपथावर असून, भविष्यात उपनगरीय वाहतूक सेवा उपलब्ध होईल. त्यामुळे पुणे ते नवी मुंबई असा प्रवास करणे सोपे होईल, त्याचबरोबर पुणे- कल्याण- मुंबई धावणाऱ्या गाड्यांचा प्रवासी त्रास व ताण कमी होण्यास मदत होईल.
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार**

> आकुर्डी रेल्वे स्थानकाचे काम काही दिवसांतच पूर्ण होऊन हे अत्याधुनिक सुसज्ज स्थानक प्रवासी लोकसेवेत दाखल होणार आहे. चिंचवड, पिंपरी, देहूरोड, तळेगाव या स्थानकावर इतर प्रवासी वाहतूक गाड्यांना भविष्यात थांबा देण्यात येईल. तसेच लोणावळा ते पुणे उपनगरीय रेल्वे वाहतूक सेवेच्या फेऱ्याही वाढविण्यात येणार आहेत.
>
> **- बशीर सुतार, केंद्रीय रेल्वे सल्लागार समिती सदस्य.**

# सामाजिक बांधिलकी जपत राजश्री गागरे यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

## राजश्रीताई गागरे यांनी समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपला वाढदिवस साजरा करत आदर्श घालून दिला.

**पिंपरी | प्रतिनिधी**


समर्थ महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका आणि म्यागनाप्लास्ट टेक्नॉलॉजीजच्या व्यवस्थापकीय संचालक राजश्रीताई गागरे यांनी समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपला वाढदिवस साजरा करत आदर्श घालून दिला.

वाढदिवसानिमित्त त्यांनी विधायक उपक्रम राबवले. त्यांनी नागरिकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात नागरिकांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देऊन, नागरिकांकडून संबंधित योजनांचे अर्ज विनामूल्य भरून घेण्यात आले. या शिबिरामध्ये आयुष्मान भारत कार्ड, रेशनिंग केवायसी (KYC), पीएम घरकुल आवास योजना, सुरक्षा विमा योजना, जीवन ज्योती विमा योजना आणि डिजिटल साक्षरता यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या योजनांबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशासकीय कामांची गुंतागुंत माहिती नसल्यामुळे अनेकदा नागरिक या लाभांपासून वंचित राहतात, अशा वेळी या शिबिराचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सुमारे ८६९ नागरिकांनी या शिबिराच्या माध्यमातून सरकारी योजनांचा लाभ सुनिश्चित केला, ही या उपक्रमाची मोठी फलश्रुती ठरली.



केवळ शासकीय योजनाच नव्हे, तर सामाजिक संवेदनशीलतेचे भान राखत राजश्रीताईंनी 'मस्ती की पाठशाला' या उपक्रमातून अनाथाश्रमाला भेट देऊन तेथील चिमुकल्यांसोबत आपला वाढदिवस साजरा केला.





यावेळी त्यांनी मुलांसोबत आनंदाचे क्षण व्यतीत करत त्यांना खाऊचे वाटप केले. वाढदिवस हा केवळ स्वतःच्या आनंदासाठी नसून तो इतरांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी असावा, हा संदेश राजश्रीताईंच्या या कृतीतून दिसून आला. समाजाप्रती असलेली आपुलकी आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून राजश्रीताई गागरे यांनी राबविलेले हे दोन्ही उपक्रम उपस्थितांसाठी आणि समाजातील इतर घटकांसाठी प्रेरणादायी ठरले

# रस्ते स्वच्छतेत पारदर्शकतेसाठी महापालिकेचा मोठा निर्णय

## गुणवत्ता वाढीसाठी महापालिकेचे नवे धोरण; मक्तेदारी रोखून पारदर्शकतेवर भर

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी झाडण्याचे काम निविदा काढून कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिले जाते. मात्र, या कामात ठेकेदारांकडून गैरप्रकार केले जात असल्याचा आरोप होतो. त्याला आळा घालण्यासाठी पुणे महापालिकेने पावले उचलली आहेत. महापालिकेने घेतलेल्या निर्णयामुळे रस्ते स्वच्छ राहण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

पुणे शहरातील रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज महापालिकेच्या माध्यमातून रस्ते झाडले जातात. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयात असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मदतीने हे रस्ते स्वच्छ केले जातात. रस्ते स्वच्छ करण्यासाठी महापालिकेकडे कायमस्वरूपी असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने महापालिका कंत्राटी कामगारांना घेऊन हे रस्ते स्वच्छ करते.

रस्ते झाडण्याचे काम ठेकेदारामार्फत केले जाते. हे काम योग्य प्रकारे व्हावे, यासाठी एका ठेकेदाराला केवळ दोनच कामे देण्याचा महत्त्वाचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी या बाबतचे आदेश काढले असून, त्याची अंमलबजावणी सुरू करण्याची तयारी महापालिका प्रशासनाने केली आहे. आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयामुळे मक्तेदारीला आळा बसून कामाची गुणवत्ता सुधारेल, असा दावा केला जात आहे.

शहरातील कायमस्वरुपी स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने रस्ते व सार्वजनिक जागा झाडण्यासाठी (झाडणकाम) निविदा काढून हे काम कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिले जाते. झाडणकामासाठी मनुष्यबळ पुरविणे आणि त्यांना किमान वेतन देणे यासाठी या निविदा काढल्या जातात. एवढेच काम असल्याने आणि यंत्रसामग्रीची आवश्यकता नसल्याने यासाठी सर्वच ठेकेदारांचे दर समान येतात. त्यावर महापालिकेकडून चिठ्ठ्या काढून, ठेकेदाराची नियुक्ती केली जाते.



### नागरिकांना मिळणार स्वच्छ आणि सुरक्षित रस्ते

**» महापालिकेच्या नव्या निर्णयामुळे शहरातील रस्ते अधिक स्वच्छ आणि सुरक्षित ठेवण्यास मदत होणार आहे. नियमित झाडणकाम, सार्वजनिक जागांची स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन यामध्ये सुधारणा करण्यावर प्रशासनाचा भर आहे. स्वच्छतेची गुणवत्ता वाढल्याने धूळ, कचरा आणि अस्वच्छतेमुळे होणाऱ्या त्रासातही घट होणार आहे. विशेषतः वाहतूक आणि पादचाऱ्यांसाठी स्वच्छ रस्ते उपलब्ध होण्यास मदत होईल. शहराचा स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यासाठी महापालिकेच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.**

### स्वच्छ रस्त्यांसाठी नवी रणनीती

**» पुणे शहरातील रस्ते अधिक स्वच्छ आणि सुस्थितीत ठेवण्यासाठी महापालिकेने झाडणकामाच्या प्रक्रियेत मोठा बदल केला आहे. एका ठेकेदाराला केवळ दोनच कामे देण्याचा निर्णय घेतल्याने मक्तेदारीला आळा बसणार असून कामावर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये स्वच्छता व्यवस्थापन अधिक जबाबदारीने राबविले जाणार आहे. यामुळे रस्ते स्वच्छतेचा दर्जा सुधारण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. नागरिकांनाही स्वच्छता मोहिमेत सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

### पारदर्शकतेवर महापालिकेचा भर

**» झाडणकामातील गैरप्रकार आणि बनावट उपस्थितीच्या तक्रारी रोखण्यासाठी महापालिकेने पारदर्शकतेवर भर देणारे नवे धोरण स्वीकारले आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांची उपस्थिती, कामाचा दर्जा आणि प्रत्यक्ष स्वच्छतेची देखरेख संबंधित क्षेत्रीय कार्यालयांकडून काटेकोरपणे केली जाणार आहे. एका ठेकेदाराकडे मर्यादित कामे दिल्याने जबाबदारी निश्चित होणार असून प्रशासनाला कामाचे अधिक प्रभावी मूल्यमापन करता येणार आहे. या निर्णयामुळे स्वच्छता कामातील स्पर्धा वाढून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

# पुण्यात ओल्या कचऱ्याचा गंभीर प्रश्न; नियम धाब्यावर, 600 प्रकल्प बंद

## दररोज 100 किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांवर महापालिकेची कारवाई; ऑनसाईट प्रक्रिया न करणाऱ्यांची होणार तपासणी

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात दररोज 100 किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, हॉटेल्स, मंगल कार्यालये आणि गृहनिर्माण सोसायट्यांना स्वतःच्या परिसरातच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक असताना अनेक ठिकाणी हे नियम पायदळी तुडविले जात असल्याचे उघड झाले आहे. अशा सोसायट्यांची पाहणी करून त्यांच्यावर कारवाई केली जाईल, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी दिली.

शहरात सुमारे 1 हजार 942 बल्क वेस्ट जनरेटर आहेत. बांधकाम नियमावलीनुसार, दररोज 100 किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी स्वतःच त्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

या संस्थांकडून दररोज सुमारे 20 टनांहून अधिक ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया होणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी प्रकल्प बंद असल्याने हा कचरा महापालिकेच्या यंत्रणेकडे किंवा इतरत्र टाकला जात असल्याचे दिसून आले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून विविध सोसायट्या आणि आस्थापनांची तपासणी करण्यात आली होती. या तपासणीत 600 पेक्षा अधिक प्रकल्प बंद असल्याचे स्पष्ट झाले होते.

नायर यांच्याकडे घनकचरा विभागाची सूत्रे आल्यावर त्यांनी शहरातील संबंधित सोसायट्या आणि संस्थांमधील कचरा प्रकल्पावर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. येथील कचरा प्रकल्प सुरू आहेत की नाही, याची पाहणी केली जाणार आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर पुन्हा कारवाई मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.



### कचरा व्यवस्थापनाला गती

**» पुणे शहरात ओल्या कचऱ्याच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी महापालिकेने पुन्हा एकदा कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. दररोज 100 किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, हॉटेल्स, मंगल कार्यालये आणि गृहनिर्माण सोसायट्यांनी स्वतःच्या परिसरातच कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शहरातील जवळपास 1 हजार 942 बल्क वेस्ट जनरेटरकडून दररोज 20 टनांहून अधिक ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया होणे अपेक्षित आहे. अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी संबंधित प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आदेश दिले असून, नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई होणार आहे. या निर्णयामुळे शहर अधिक स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाच्या दिशेने वाटचाल करणार आहे.**

# महसूल कारभारात पारदर्शकतेकडे मोठे पाऊल

## ठोस पुराव्याशिवाय कारवाई नाही; शासनाच्या नव्या निर्णयामुळे सह-हिस्सेदारांना मोठा दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

अवैध गौण खनिज उत्खनन किंवा भरावाच्या नावाखाली सातबारा उताऱ्यावरील सर्व सह-हिश्सेदारांना सरसकट दंडाच्या नोटिसा बजावणाऱ्या महसूल विभागाच्या कारभाराला राज्य शासनाने मोठा चाप लावला आहे. आता नवीन आदेशानुसार आता ठोस पुराव्याशिवाय आणि केवळ अंदाजावर आधारित कोणालाही नोटीस धाडता येणार नाही.

तसेच, बेकायदा उत्खनन केल्याप्रकरणी दंड न भरल्यास सातबारा उताऱ्यावर त्या व्यक्तीच्या नावे बोजा चढविण्यात यावा. शासनाच्या या निर्णयामुळे त्या सातबारा उताऱ्यावरील अन्य सह हिस्सेधारकांना त्रास होणार नाही.

मागील अधिवेशनात विधानसभेमध्ये यासंदर्भात लक्षवेधी सूचना काही आमदारांनी मांडली होती. त्यानुसार महसूल विभागाने हे परिपत्रक जारी केले आहे. अनेकदा जमिनीचा गट नंबर किंवा हिस्सा नंबर निश्चित न करता, तहसीलदार केवळ संशयावरून संपूर्ण सातबारा उताऱ्यावर नाव असलेल्या सर्व सहधारकांना नोटीस पाठवायचे.

गौण खनिजाचा भराव जमिनीच्या एका कोपऱ्यात किंवा ठराविक हिश्श्यावर असतानाही, एकाच फेरफाराद्वारे सर्वांच्याच सातबारा उताऱ्यावर लाखो रुपयांच्या दंडाचा बोजा चढवला जात होता. यामुळे नक्की दोषी कोण, हे स्पष्ट होत नव्हते. या जाचातून नागरिकांची सुटका करण्यासाठी शासनाने आता मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाचे कार्यासन अधिकारी सदानंद मोहिते यांनी जारी केले आहे.



### सह-हिस्सेदारांना मोठा दिलासा

» राज्य शासनाच्या नव्या निर्णयामुळे सातबारा उताऱ्यावर नाव असलेल्या निष्पाप सह-हिस्सेदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी अवैध गौण खनिज उत्खनन किंवा भराव प्रकरणात संपूर्ण सातबारावरील सर्व व्यक्तींना सरसकट नोटिसा दिल्या जात होत्या. त्यामुळे चुकीचा आर्थिक बोजा अनेक नागरिकांवर पडत होता. आता मात्र दोषी व्यक्तीची स्पष्ट ओळख पटवूनच कारवाई केली जाणार आहे. संबंधिताने दंड न भरल्यास त्याच्याच नावावर बोजा चढविला जाणार असल्याने इतर सहधारकांना त्रास सहन करावा लागणार नाही. या निर्णयामुळे महसूल विभागाच्या कारभारात पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### महसूल कारभारात पारदर्शकतेवर भर

» शासनाच्या नव्या आदेशामुळे महसूल विभागाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि जबाबदारी येणार असल्याचे मानले जात आहे. यापूर्वी सातबारा उताऱ्यावरील सर्व सहधारकांना नोटिसा देण्याच्या पद्धतीमुळे नागरिकांमध्ये भीती आणि नाराजीचे वातावरण होते. आता मात्र ठोस पुरावे, प्रत्यक्ष पडताळणी आणि पंचनाम्याच्या आधारेच कारवाई केली जाणार आहे. तसेच रॉयल्टी पावती नसल्यास अधिकाऱ्यांनी सरकारी नोंदी तपासून खात्री करणे आवश्यक राहणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे निष्पाप जमीनधारकांना होणारा त्रास कमी होण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### प्रत्यक्ष पाहणीनंतरच होणार कारवाई

» महसूल विभागाने जारी केलेल्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आता केवळ संशयाच्या आधारावर दंडात्मक कारवाई करता येणार नाही. अवैध उत्खनन किंवा भराव प्रकरणात तलाठी, मंडळ अधिकारी किंवा तहसीलदारांना प्रत्यक्ष पंचनामा करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच तहसीलदार किंवा उपविभागीय अधिकाऱ्यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी करणे आवश्यक करण्यात आले आहे. यामुळे कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या अहवालांवर आधारित होणाऱ्या कारवायांना आळा बसणार आहे. संबंधित व्यक्तीची बाजू ऐकून घेतल्याशिवाय पुढील कारवाई न करण्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# इंधन दरवाढीची पालकांना झळ ; शालेय बसची भाडेवाढ अटळ

## वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर बस सेवा सुरळीत ठेवण्यासाठी नियोजन; पालकांना सहकार्याचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

पेट्रोल, डिझेलच्या दरात दिवसेंदिवस वाढ होत असून यामुळे आता शालेय बसचे भाडेही वाढणार आगहे. याबाबत शालेय बस असोसिएशनच्या पातळीवर जोरदार हालचाली सुरु झालेल्या आहेत. या बसची भाडेवाढ होणार असल्याने पालकांना त्याची मोठी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष येत्या १५ जून पासून सुरु होणार आहे. राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य बोर्डाच्या शाळा त्याआधीच सुरु होत असतात. शाळा सुरु होण्याच्या पार्श्वभुमीवर विद्यार्थी अन पालकांचीही लगबग सुरु झालेली आहे. पश्चिम आशियातील युध्दामुळे जागतिक बाजारातील कच्च्या इंधनाचे दर दररोज वाढत आहेत.

त्यामुळे सार्वजनिक इंधन कंपन्यांनी इंधनाचे दर वाढविले आहेत. पेट्रोल, डिझेल दरात वाढ होतच आहे. इंधनाची बचत करण्याबाबत पतंप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला आवाहनही केले आहे. त्यामुळे शाळा ऑनलाईन सुरु करण्याबाबतही चर्चा सुरु असली तरी त्याबाबत अद्याप संभ्रम आहे.

पुणे शहरात सुमारे ४ हजार स्कूल बस आहेत. या बसच्या माध्यमातुन मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना वाहतुक सुविधा पुरविण्यात येत असतात. वाढत्या महागाईमुळे आधीच पालक आर्थिक अडचणीच सापडलेले आहेत. त्यात आता गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. ही वाढ थांबायला काही तयार नाही. त्यामुळे स्कुल बस, रिक्षा, व्हॅन यांचीही भाडेवाढ होणार आहे.




> पेट्रोल, डिझेलच्या दरात भरमसाठ वाढ होतच चालली आहे. त्यामुळे स्कूल बसेसची भाडेवाढ करावीच लागणार आहे. त्याशिवाय काहीच पर्याय नाही. मात्र भाडेवाढ किती करायची, याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. भाडेवाढीबाबत येत्या गुरुवारी (दि.२८) स्कूल बस चालकांची बैठक घेण्यात येणार आहे. त्यात सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.
>
> - रोहिदास दगडे, उपाध्यक्ष, स्कूल बस असोसिएशन